(१०१) (१८५)

जिल्हा परिषद, रत्नागिरी
शिक्षण विभाग (प्राथमिक)
भारतरत्न डॉ.बाबासाहेबत आंबेडकर भवन, दुसरा मजला,
रत्नागिरी, ४१५६१२

दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२५७६/२७१००६ ई-मेल- eoprirat@gmail.com /ssaratnagiri1@yahoo.co.in

जा.क्र.रजिप/शिक्षण/ ड-७ /१५०७ /२०१७ दिनांक- / १२/ २०१७
२२/१२/२०१७

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट ऑफिस लेन,
डॉ.आंबेडकर रोड,परेल मुंबई-१२ संचलित
पोदार इंटरनॅशनल स्कुल,
तालुका - रत्नागिरी.
जिल्हा - रत्नागिरी.

विषयः- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अनुषंगाने नवीन शाळांना प्रथम मान्यता देणेबाबत.

संदर्भः- १) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १९ जानेवारी २०१३,
२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रः एसएफएस-१०१७/प्र.क्र. १८३/एसएम-२, दिनांक ०६ मे, २०१७.
३) शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचेकडिल पत्र क्र.जा.क्र.प्राथ/कोवि/स्वंअशा/पर/ १६-१७/१८४६६-७१, दिनांक १० ऑगस्ट २०१७
४) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमेश्वर यांचेकडील जा.क्र.पंसदे/शिक्षण/आस्था-१ /१८४५/ २०१७, दिनांक :- २९/११/२०१७ रोजीचा तपासणी अहवाल.
५) शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद,रत्नागिरी यांची दिनांक /११/२०१७ रोजीची मंजुर टिप्पणी.

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे करीता प्रस्ताव सादर केला होता. त्याप्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळांना प्रथम मान्यता देणेकरीता खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी देणेत येत आहे.

शाळेचा प्रकार - प्राथमिक ते उच्च माध्यमिक

| संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जावाढ | मंडळ संलग्नता | परवानगी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| पोदार एज्युकेशन ट्रस्ट ८५ चमारबाग पोस्ट्र ऑफिस लेन, डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई-१२ | पोदार इंटरनॅशनल स्कुल, सर्व्हे नं.२६ ब, सिध्दीविनायक रिगालिया, कारवांचीवाडी रोड, कुवारबाव,रत्नागिरी. | इंग्रजी | नवीन | सी.बी.एस.ई. | २०१६-२०१७ |

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२) शासनाने ज्या ठिकाणसाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यास येईल,
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून असेल.

४) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग सुरू करता येणार नाहीत.

५) परवानगी मिळाल्यापासून १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शळा सुरू न केल्यास सदर परवानगी रद्द बातल ठरेल.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन/दर्जावाढ शाळा यांना केंद्र व राज्य शासनाने शिक्षण विषयक अधिनियम, नियम,वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/दर्जावाढ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१०) नवीन/दर्जावाढ शाळांमध्ये शासन निर्णय दिनांक २९/६/२०१३ नुंसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील प्राथमिक शाळांच्या संदर्भात RTE act २००९ मध्ये नमूद केलेल्या सर्व मानकांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

११) शाळेमध्ये आकारणेत येणारे शैक्षणिक शुल्क प्रचलि नियम तसेच वेळोवेळी होणा-या सुधारीत नियमानुसार आकारणेत यावे. तथापि सदरचे शैक्षणिक शुल्क अवाजवी असू नये. नियमबाहय शुल्क आकारणी केलेस योग्य ती कारवाई करणेत येईल.

१२) अधिनियमातील तरतूदीनुसार संस्था वरील वर्ग कायम विना अनुदानित तत्वावर चालविण्यास कायमपणे आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे. या वर्गाना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी दिली असल्याने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

१३) शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकुल,स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

१४) शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे. तसेच नियुक्त शिक्षकवर्गाची सक्षम प्राधिका-याकडून मान्यता घेतली पाहीजे तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहीजे.

१५) संस्थेकडील भौतिक सुविधा व्यवस्थापन विषयक सुविधा इ शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.शासन निर्णय दिनांक २९.६.२०१३ मध्ये दिलेल्या मूलभूत सुविधांच्या निक षाची पूर्तता असणे आवश्यक आहे.

१६) संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे,तसेच अभ्यासक्रम,पाठयपुस्तके/मूल्यमापन पध्दती शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

१७) संस्थेने शाळेतील विदयार्थ्यासाठी/कर्मचा-यासाठी विहीत नोंदवहया अदयावत विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

१८) संस्थेने/शाळेने प्राथमिक शाळा शाळा संहिता,महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली१९८१मधील तरतूदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीच,नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१९) शासन निर्णय दि.३/११/२००९ नुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोड इमारत असणाच्या अधिन राहून सदरची मान्यता देण्यात येत आहे.

२०) शाळेने ज्या अभ्यासक्रम मंडळाशी सलग्न होण्यासाठी या अधिनियमा अंतर्गत परवानगी मागणीकेली असेल त्या अभ्यासक्रम मंडळ सलग्नसाठी प्रचलित नियमानुसार विहीत नमुन्यात कार्यपध्दती नुसार शिक्षण उपसंचालक यांचेकडे अर्ज करेल.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी.

प्रत-मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पूणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत-मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रत्नागिरी यांना माहितीसाठी